# ईश्वराच्या दयेची याचना करणे

पद्मभूषण मौलाना वहीदुद्दीन खान यांच्या *‘Seeking God’s Mercy in This Crisis’* या लेखाचा हा मराठी अनुवाद आहे. लेखकाचं वय सध्या सुमारे शंभर वर्षे आहे आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अध्यात्माचा अभ्यास आणि अध्यात्मावर लिखाण यामध्ये खर्च केले आहे. अनेक शांती पुरस्कारांनी जगाने लेखकाला सन्मानित केले आहे.

कदाचित इतिहासातील सर्वात मोठ्या संकटाला आज आपण तोंड देत आहोत. करोना व्हायरसचं हे संकट आहे. हे संकट मानवजातीला यासाठी धडकलेलं नाही की आपण परिस्थितीबद्दल नकारात्मक बोलायला सुरुवात करावी. त्यापेक्षा, आपण आपल्या निर्मात्याला, विश्वाच्या मालकाला हाक मारायला पाहिजे, ज्याने आपल्या सर्वांना निर्माण केले आहे.

कुराणात ईश्वर म्हणतो: मी जिन्न व मानवजातीला निर्माण केले, माझी केवळ प्रार्थना करण्यासाठी. (५१:५६)

प्रार्थनेची हीच भावना आपल्यात जागृत करण्यासाठी करोना व्हायरसचं संकट आलं आहे. हे संकट शिक्षा म्हणून नाही, ना ती वार्ता आहे प्रलयाच्या आगमनाची, ना ते आपला विनाश करण्यासाठी आहे. खरे तर, आपण ईश्वराचे स्मरण करावे म्हणून ते आहे, ईश्वराला हाक मारावी म्हणून आहे. प्रेषितांच्या एका वक्तव्याच्या आधारावर, मी असे म्हणू शकतो की ईश्वर आता माणसाच्या अगदी जवळ आला आहे, जेणेकरून लोकांनी त्याला हाक मारावी आणि त्याने त्यांच्या हाकेचे उत्तर द्यावे.

हा क्षण एखाद्याला दोष देण्याचा किंवा नकारात्मक बोलण्याचा नाही. त्याऐवजी, संपूर्ण जगाने, सर्व लोकांनी एकत्रितरीत्या आपल्या प्रभूला हाक मारली पाहिजे. जेव्हा सर्व मानवजात ईश्वराला हाक मारेल, तेव्हा असे होणार नाही की ईश्वर त्यांना उत्तर देण्यास नकार देईल. हे शक्य नाही.

माझ्या मते, आता आपल्याला दोन गोष्टी कराव्या लागतील: एक म्हणजे संकटाला समोरून तोंड देणाऱ्या लोकांच्या सल्ल्याचे आपण पालन केले पाहिजे, म्हणजे शासनाच्या आणि डॉक्टरांच्या सल्ल्याचे. आणि दुसरे, ईश्वराचे स्मरण करत त्याच्यासमोर नतमस्तक व्हायला पाहिजे.

आपल्याला शासन आणि डॉक्टरस् यांच्या मार्गदर्शक सूचनांचे अनुसरण करण्याची आवश्यकता आहे, कारण ते या विषयातील तज्ञ आहेत. त्यांच्याकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचना आपण पाळल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे आपण आपल्या प्रभूला हाक मारली पाहिजे. सर्वशक्तिमान ईश्वराचे आपण स्मरण केले पाहिजे. जेव्हा माणूस आपल्या निर्मात्याला हाक मारतो, तेव्हा तो नक्कीच त्याला उत्तर देतो. हे शक्य नाही की मनुष्य आपल्या प्रभूला हाक मारेल आणि तो प्रतिसाद देणार नाही.

सर्वशक्तिमान ईश्वराला मी प्रार्थना करतो की त्याने त्याच्या असहाय सेवकांवर दया करावी, त्याच्या लोकांवर दया करावी ज्यांना त्याने निर्माण केले. हा क्षण आपल्यातील दासतेची भावना जागृत करण्याचा आहे. प्रभूला विसरलेल्या व्यक्तीने प्रभूचे स्मरण करण्याचा हा क्षण आहे. आजकाल एक प्रार्थना मी वारंवार म्हणतो: हे जिवंत ईश्वरा, हे सदैव राहणाऱ्या ईश्वरा, तुझ्या करुणेत आम्ही याचना करतो तुझ्या साहाय्याची, पीडानिवारणाची!

१९४० मधील एका घटनेचा मी साक्षीदार आहे. तेव्हा मी उत्तर प्रदेशातील सराय मीरमध्ये होतो. त्या काळात मोठा दुष्काळ होता. पाऊस पडला नव्हता आणि सर्व लोक खूप त्रस्त झाले होते. त्या काळात तेथे एक गुरू होते, मौलाना सय्यद साहेब, ज्यांचा लोक खूप आदर करायचे. लोकांच्या आग्रहाने काही जणांसह ते गावाबाहेर एका शेतात गेले. आपले हात पूर्ण पसरून त्यांनी ईश्वराला प्रार्थना केली: ‘‘हे ईश्वरा, तुझे सेवक तहानलेले आहेत! काय तू त्यांच्यावर पाऊस पाडणार नाहीस?’’

त्या प्रार्थनेमध्ये मी सुद्धा होतो. आम्ही दोन रकात नमाज पूर्ण केली आणि सराय मीरला परतलो. जेव्हा आम्ही शेताकडे निघालो तेव्हा आमचा संपूर्ण भोवताल कोरडा होता, पण जेव्हा आम्ही परतत होतो, पाऊस पडायला सुरुवात झाली होती. कोरडेपणामध्ये आम्ही आमचा प्रवास सुरू केला होता पण परतीच्या प्रवासात आमचे कपडे ओले झाले होते. सन १९४० मध्ये अगदी माझ्या डोळ्यासमोर हे घडले.

मी ईश्वराला प्रार्थना करतो: हे प्रभू, हे दयाळू ईश्वरा, हे निर्मात्या, आमच्यावर दया कर! या संकटाचा अंत कर. ही अडचण आमच्यापासून दूर कर. आमच्यावर दया कर. ज्यांना तू निर्माण केले आहे त्यांच्यावर दया कर. ते तुझ्या दयेची वाट पाहत आहेत. हे ईश्वरा, आम्ही असाहाय्य आहोत. तुझ्या मदतीशिवाय आम्ही काहीही करू शकत नाही. आमच्यावर दया कर. हे संकट, ही अडचण आमच्यापासून दूर कर. हे सर्वोच्च ईश्वरा, आमच्यावर दया कर. हे ईश्वरा, तुझ्या प्रेषिताने म्हटले होते: ‘हे जिवंत ईश्वरा, हे सदैव राहणाऱ्या ईश्वरा, तुझ्या करुणेत आम्ही याचना करतो तुझ्या साहाय्याची!’ मी तेच वाक्य पुन्हा म्हणेन, ‘हे जिवंत ईश्वरा, हे सदैव राहणाऱ्या ईश्वरा, तुझ्या करुणेत आम्ही याचना करतो तुझ्या साहाय्याची!’